॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572
NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT
website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246
E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/१२५ दिनांक १२/०८/२०२४

परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन समारंभ साजरा करणे बाबत.**

संदर्भ: १) मा. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे जा.क्र.सीईआर–२०२४/प्र.क्र.१२५/राशि–१ दिनांक ०९ ऑगस्ट २०२४ रोजीचे परिपत्रक.
२) उच्च शिक्षण मंत्री मा. चंद्रकांत दादा पाटील यांच्या सोबतची आज दिनांक १२/०८/२०२४ रोजीची ऑनलाईन बैठक.

महोदय,

उपरोक्त विषयी मा. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी संदर्भ क्र. १ च्या परिपत्रकान्वये गुरूवार दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन समारंभ साजरा करण्यात येणार आहे. स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम एन.एस.एस. व एन.वाय.के.एस. द्वारे देशभक्तीपर मोहिम राबविण्यात यावी तसेच देशभक्तीपर किंवा राष्ट्रीय एकात्मते संबधातील गाण्यांचा प्रचार करावा तसेच ऐतिहासिक महत्वाच्या किल्ल्यांवर (उदा. रायगड, सिंहगड, शिवनेरी, पुरंदर, वसई, प्रतापगड, दौलताबाद व सिताबर्डी) राष्ट्रध्वज उभारण्यात यावा असे कळविलेले आहे. तसेच उच्च शिक्षण मंत्री मा. चंद्रकांत दादा पाटील यांच्या सोबत आज दिनांक १२/०८/२०२४ रोजीच्या बैठकीतील सुचनेनुसार महाविद्यालयातील रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी व रा.से.यो. स्वंयसेवकांनी दिनांक १३, १४ व १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत खालील उपक्रम महाविद्यालयात राबविण्याबाबत सुचित केले आहे.

१) हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत सलग तीन दिवस आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकविण्यात यावा.
२) आपल्या शहरातील व गावातील महापुरूष, राष्ट्रपुरूषांच्या पुतळयांची स्वच्छता करणे.
३) हुतात्मा स्मारकांची स्वच्छता करणे.
४) महाविद्यालय परिसराची स्वच्छता करणे.
५) समाजामध्ये हर घर तिरंगा उपक्रमांविषयी जनजागृती करून राबविणे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात उपरोक्त पणे निर्देशित केलेल्या सुचनेनुसार स्वातंत्र्य दिना निमित्त विविध उपक्रम राबविण्यात यावेत व त्या बाबतचा आहवाल फोटो, व्हिडिओ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या nss@srtmun.ac.in या ई–मेल वर पाठविण्यात यावेत, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयाचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.